ePaper

टीएमसीचे 22 खासदार फुटले? खासदार काकोली यांच्या दाव्याने राजकारणात खळबळ



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™




पालखी रथ ओढण्याचा मान संस्थानच्या बैलजोड्यांनाच

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 15 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## 14 कलमी करारामुळे हॉर्मुझ सामुद्रधुनी खुली होणार

# धक्कादायक.. भारताचे 'विराट' जहाज बुडाले..!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**इराण आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय समुद्रमार्गातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. ओमानच्या किनाऱ्याजवळ भारतीय ध्वज असलेले ‘विराट’ हे व्यापारी जहाज तांत्रिक बिघाडामुळे समुद्रात बुडाले. मात्र, अमेरिकन नौदल आणि ओमानच्या सुरक्षा यंत्रणांनी राबविलेल्या संयुक्त बचाव मोहिमेमुळे जहाजावरील सर्व १४ भारतीय खलाशांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले.**



मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी पहाटे ओमानमधील रास अल हद्द किनाऱ्याच्या पूर्वेस सुमारे ८० नॉटिकल मैल अंतरावर ही घटना घडली. भर समुद्रात प्रवास करत असताना ‘विराट’ जहाजाच्या इंजिनमध्ये अचानक बिघाड झाला. काही वेळातच जहाजात मोठ्या प्रमाणावर पाणी शिरू लागले आणि परिस्थिती गंभीर बनली. जहाज बुडण्याचा धोका लक्षात येताच खलाशांनी तातडीने आंतरराष्ट्रीय आपत्कालीन संदेश प्रसारित केला.

हा संदेश मिळताच ओमानच्या सागरी सुरक्षा यंत्रणा, अमेरिकन नौदल तसेच जवळून प्रवास करणाऱ्या इतर व्यापारी जहाजांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले. अमेरिकन नौदलाने अत्याधुनिक सागरी गस्ती विमान शोध मोहिमेसाठी पाठविले. या विमानाच्या मदतीने बुडणाऱ्या जहाजाचे अचूक ठिकाण शोधण्यात आले. त्यानंतर संयुक्त बचाव पथकांनी समुद्रात मोठी मोहीम राबवत सर्व १४ भारतीय खलाशांना सुरक्षित बाहेर काढले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी जहाज पूर्णपणे समुद्रात बुडाल्याचे सांगण्यात येत आहे. बचावलेल्या खलाशांना वैद्यकीय तपासणीसाठी सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती देण्यात आली आहे.

दरम्यान, ही दुर्घटना तांत्रिक कारणांमुळे घडल्याचे प्राथमिक तपासात समोर येत असले तरी ज्या परिसरात घटना घडली तो ‘स्ट्रेट ऑफ होर्मुझ’जवळचा अतिसंवेदनशील सागरी पट्टा मानला जातो. जागतिक तेलवाहतूक आणि व्यापारी वाहतुकीसाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा असून सध्या इराण-अमेरिका तणावामुळे या परिसरातील सुरक्षा व्यवस्थेवर विशेष लक्ष ठेवले जात आहे. गेल्या काही दिवसांत या भागातील व्यापारी जहाजांवर झालेल्या हल्ल्यांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. काही घटनांमध्ये भारतीय खलाशी असलेल्या जहाजांनाही फटका बसला असून जीवितहानीच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे व्यापारी जहाजांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

या दुर्घटनेनंतर भारतीय खलाशांच्या सुरक्षित सुटकेमुळे दिलासा मिळाला असला तरी आंतरराष्ट्रीय सागरी मार्गांवरील वाढता तणाव आणि सुरक्षेची आव्हाने यामुळे जागतिक स्तरावर चिंता व्यक्त केली जात आहे.

### होर्मुझ सामुद्रधुनीतील वाढता तणाव

जागतिक तेलवाहतूक आणि आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी महत्त्वाची मानली जाणारी होर्मुझ सामुद्रधुनी सध्या इराण-अमेरिका तणावामुळे चर्चेत आहे. गेल्या काही दिवसांत या परिसरातील व्यापारी जहाजांवर हल्ल्यांच्या घटना घडल्या असून काही खलाशांचा मृत्यूही झाला आहे. त्यामुळे या सागरी मार्गावरील सुरक्षा आणि व्यापारी जहाजांच्या संरक्षणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

### १४ भारतीय खलाशी मृत्यूच्या दाढेतून बचावले

ओमानच्या रास अल हद्द किनाऱ्यापासून सुमारे ८० नॉटिकल मैल अंतरावर भारतीय ध्वज असलेले ‘विराट’ हे व्यापारी जहाज तांत्रिक बिघाडामुळे समुद्रात बुडाले. जहाजावरील १४ भारतीय खलाशांनी तातडीने आपत्कालीन संदेश पाठवल्यानंतर अमेरिकन नौदल, ओमानच्या सुरक्षा यंत्रणा आणि इतर व्यापारी जहाजांच्या मदतीने संयुक्त बचाव मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत सर्व १४ भारतीय खलाशांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले.

# पालखी रथ ओढण्याचा मान संस्थानच्या बैलजोड्यांनाच

## परिसरातील शेतकऱ्यांनी नाराज न होता निर्णयाला सहकार्य करावे, संस्थानचे आवाहन

**महाईन्यूज । पुणे**

**जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांचा पालखी रथ ओढण्याचा व चौघडागाडीचा मान यंदाही श्री संत तुकाराम महाराज संस्थानच्या वतीने खरेदी केलेल्या बैलजोड्यांना देण्यात येणार असल्याची माहिती पालखी सोहळाप्रमुख विक्रमसिंह महाराज मोरे यांनी दिली.**

देहूगाव ते चिंचोळी येथील पादुका मंदिरापर्यंत पालखी रथास जुंपण्याचा मान स्थानिक शेतकऱ्यांच्या बैलजोडीला द्यावा, अशी मागणी करणारा अर्ज स्थानिक शेतकरी मधुकर काळोखे यांनी संस्थानला दिला आहे. मात्र, संस्थानने स्वत:च बैलजोड्या घेऊन त्याच बैलजोड्या रथाला जुंपण्याची ठाम भूमिका घेतली आहे.

विक्रमसिंह महाराज मोरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, गतवर्षीप्रमाणेच यंदाही पालखी रथासाठी दोन बैलजोड्या व चौघडागाडीसाठी एक अशा खिलार जातीच्या देखण्या, तंदुरुस्त आणि सक्षम तीन बैलजोड्या खरेदी करण्यात येणार आहेत. त्यामुळे इतर कोणत्याही बैलजोड्या जुंपण्याचा प्रश्नच येत नाही.

यंदा सातारा जिल्ह्यातील बावधन गाव परिसर व कर्नाटक राज्यात या बैलजोड्यांचा शोध सुरू आहे. हा शोध घेताना त्या बैलांचे आरोग्य, श्रमता या निकषांसह निरीक्षण व परीक्षण करून खरेदी करण्यात येणार आहे. यापूर्वी परिसरातील शेतकऱ्यांच्या बैलजोड्यांना संधी देण्यात आली आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांनी नाराज होऊ नये व संस्थानने घेतलेल्या निर्णयाला सहकार्य करावे, असे आवाहन विक्रमसिंह महाराज मोरे यांनी केले आहे.




### पालखीसाठी तीन बैलजोड्या

श्री संत तुकाराम महाराज पालखी रथासाठी दोन तर चौघडागाडीसाठी एक अशा एकूण तीन खिलार जातीच्या बैलजोड्या यंदा संस्थानकडून खरेदी करण्यात येणार आहेत. सातारा जिल्ह्यातील बावधन परिसर व कर्नाटक राज्यात बैलजोड्यांचा शोध सुरू असून आरोग्य, श्रमक्षमता व तंदुरुस्तीच्या निकषांवर अंतिम निवड केली जाणार आहे.

# पुण्यात रंगणार ऐतिहासिक शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

**महाईन्यूज । पुणे**

**अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ऐतिहासिक शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रांगणात २८ ते ३१ जानेवारी २०२७ या कालावधीत होणार आहे. चार दिवस चालणारे हे संमेलन भव्य, दिमाखदार आणि ऐतिहासिक स्वरूपात पार पडणार असल्याची माहिती महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी रविवारी पत्रकार परिषदेत दिली.**

शंभराव्या साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर 'नांदी शंभराव्या साहित्य संमेलनाची' हा विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत पुणे आणि मुंबई वगळता ज्या ठिकाणी आजवर साहित्य संमेलने भरलेली नाहीत, अशा महाराष्ट्रातील ४८ ठिकाणांसह राज्याच्या विविध भागांमध्ये एकूण ९९ साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. १५ ऑगस्ट २०२६ ते १५ जानेवारी २०२७ या कालावधीत हे उपक्रम पार पडतील. या माध्यमातून राज्यभर साहित्य चळवळीला चालना देत शंभराव्या साहित्य संमेलनाची नांदी करण्यात येणार आहे.

संमेलनाचे संयोजक राजेश पांडे, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक आणि कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर यांच्यासह महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक रविवारी पुण्यात पार पडली. या बैठकीत संमेलनाचे स्थळ आणि तारखांबाबत सर्व सदस्यांनी एकमताने मंजुरी दिली.

संमेलनासाठी आवश्यक असलेले विस्तीर्ण प्रांगण, मोठ्या प्रमाणावर वाहनतळाची सुविधा, निवास व्यवस्था आणि विविध कार्यक्रमांसाठी आवश्यक असलेली पायाभूत सुविधा यांचा विचार करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची निवड करण्यात आल्याचे सोमण यांनी सांगितले. विद्यापीठातील सुमारे दीड हजार प्राध्यापक आणि कर्मचारी संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करतील, अशी ग्वाही कुलगुरू सुरेश गोसावी यांनी दिली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

रविवारी झालेल्या बैठकीस ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांच्यासह महामंडळाचे सर्व सभासद उपस्थित होते. बैठकीत संमेलनाच्या आयोजनासंदर्भातील विविध पैलूंवर सविस्तर चर्चा करण्यात आली.







### पुणे विद्यापीठाची निवड का?

याबाबत बोलताना योगेश सोमण म्हणाले की, २०१० मध्ये ८३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुण्यातील सर परशुरामभाऊ महाविद्यालयात झाले होते. मात्र, त्या परिसरातील वाहतूक व्यवस्थेच्या अडचणी लक्षात घेता यावेळी तो पर्याय योग्य वाटला नाही. महाविद्यालयाच्या परिसरात एखादे वाहन बंद पडले तरी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होते. त्यामुळे हजारो साहित्यप्रेमी, लेखक, कवी आणि रसिक सहभागी होणाऱ्या शंभराव्या साहित्य संमेलनासाठी प्रशस्त आणि सर्व सुविधांनी युक्त असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रांगण अधिक योग्य असल्याने त्याची निवड करण्यात आली. संमेलनाच्या निमित्ताने राज्यभर साहित्यिक वातावरण निर्माण करण्याचा महामंडळाचा प्रयत्न असून, शंभरावे साहित्य संमेलन मराठी साहित्यविश्वातील एक महत्त्वाचा आणि संस्मरणीय टप्पा ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# स्वेच्छानिवृत्तीनंतर उघड झाला गर्भपाताचा गोरखधंदा

## डॉ. मोटे यांच्या बेकायदेशीर गर्भलिंग निदान प्रकरणाचे धागेदोरे शासकीय सेवेकाळापर्यंत

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुण्यातील बेकायदेशीर गर्भलिंग निदान आणि गर्भपात रॅकेटप्रकरणी अटक करण्यात आलेल्या डॉ. तुकाराम मोटेच्या कारनाम्यांची व्याप्ती आता केवळ खासगी रुग्णालयांपुरती मर्यादित नसून, त्याच्या २५ वर्षांच्या शासकीय कार्यकाळापर्यंत पोहोचली आहे. डॉ. मोटे यापूर्वी शासकीय सेवेत वर्ग-१ चा वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होता. त्याने गेल्या वर्षी स्वेच्छानिवृत्ती घेतली असल्याचे स्पष्ट झाले आहे.**



या काळ्या कारनाम्यामुळे शासकीय कार्यकाळात केलेल्या सर्वच शस्त्रक्रिया आणि वैद्यकीय कामकाज संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. डॉ. मोटे याने शासकीय सेवा काळातील स्त्रियांच्या शस्त्रक्रिया आणि अवैध गर्भपातांची संख्या मोठी असण्याची शक्यता आहे. ५०० हून अधिक भ्रूणहत्यांना जबाबदार असणाऱ्या आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना या गुन्ह्यात सह-आरोपी करावे, अशी मागणी आरोग्य कार्यकर्ते शरद शेट्टी यांनी केली आहे.



> डॉ. तुकाराम मोटे याने शासकीय सेवेतून स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे. या प्रकरणाची पोलिस चौकशी सुरू असून, अहवाल आल्यानंतर त्याच्या कार्यकाळातील कामकाजाची विभागीय चौकशी होईल.
>
> **- डॉ. नागनाथ येमपल्ले, जिल्हा शल्यचिकित्सक, पुणे**

### वरिष्ठ अधिकाऱ्यांवरही संशय

डॉ. मोटे यांच्या कारवायांची माहिती काही वरिष्ठ अधिकाऱ्यांना होती का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. शरद शेट्टी यांनी आरोप केला की, रुग्णालय प्रशासन आणि काही वरिष्ठ अधिकाऱ्यांची मूकसंमती असल्यामुळेच हा प्रकार दीर्घकाळ सुरू राहू शकला. त्यामुळे या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांनाही सहआरोपी करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

### शासकीय सेवेतील २५ वर्षे आणि संशयाचा विळखा

डॉ. तुकाराम मोटे यवत येथील ग्रामीण रुग्णालयात वर्ग-१ चा वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होता. त्याने वैयक्तिक अडचणींचे कारण पुढे करून ४ जून २०२५ रोजी स्वेच्छानिवृत्ती घेतली खरी; परंतु त्याची २५ वर्षांची संपूर्ण शासकीय कारकीर्द वादग्रस्त राहिलेली आहे. सरकारी रुग्णालयात सेवा देत असताना त्याने केलेल्या स्त्रियांच्या शस्त्रक्रिया, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया आणि संशयास्पद गर्भपात यांची सखोल चौकशी झाल्यास ही संख्या शेकडोंच्या घरात जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

# कुदळवाडीत कारवाईनंतर गजबजलेले मजूर अड्डे ओस

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चिखलीसह कुदळवाडी परिसरातील अवैध बांधकामे, भंगाराची गोदामे आणि लघुउद्योगांवर महापालिका प्रशासनाने केलेल्या कारवाईचा फटका येथील मजूर अड्ड्यांना बसला आहे. एकेकाळी सकाळपासून मजुरांच्या गर्दीने गजबजून जाणारे अड्डे आता ओस पडल्याचे चित्र दिसत आहे. पूर्वी शेकडो मजूर कामाच्या प्रतीक्षेत येथे उभे राहत होते. मात्र, सध्या केवळ ४० टक्के मजूरच दिसून येत असून ६० टक्के मजुरांनी इतर भागात स्थलांतर केल्याची माहिती स्थानिकांनी दिली.**



### या भागातून येतात मजूर

चिखलीच्या कुदळवाडी येथील मजूर अड्यांवर महाराष्ट्रातील बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, सोलापूर आदी जिल्ह्यांसह उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, मध्य प्रदेश या राज्यातून कामगार येतात. काहीजण कुटुंबासह येथे वास्तव्यास होते.

कुदळवाडी, चिखली आणि परिसरात भंगार व्यवसाय, पत्राशेडमधील लघुउद्योग, वेल्डिंग कामे, प्लास्टिक प्रक्रिया उद्योग, गोदामे, तसेच बांधकाम व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू होते. या उद्योगांमुळे हजारो परप्रांतीय आणि ग्रामीण भागातील मजुरांना रोजगार मिळत होता. मात्र, गेल्यावर्षी आणि नुकतीच प्रशासनाने येथील अवैध बांधकामांवर कारवाई केली. यामुळे अनेक भंगार गोदामे आणि छोटे उद्योग बंद पडले. त्यामुळे कामगारांवर बेरोजगारीची वेळ आली आहे.

हे मजूर बांधकाम मजूर, सेंट्रिंग कामगार, रंगकाम, प्लम्बिंग, वेल्डिंग, भंगार वर्गीकरण, ट्रक लोडिंग-अनलोडिंग, गोदामांमधील माल चढ-उतार, फॅब्रिकेशन, पत्राशेड उभारणी, साफसफाई आणि लघुउद्योगांतील विविध कामे करत होते.

रोजंदारीवर काम करणाऱ्या या मजुरांना कामाच्या स्वरूपानुसार प्रतिदिन ८०० ते १००० रुपये मिळत होते. कुशल कामगारांना १२०० ते १४०० रुपयांपर्यंत मजुरी मिळत होती. आता ती मजुरी बुडाल्याने काही जणांचा शहरात इतरत्र मजुरीसाठी शोध सुरू आहे. काहीजण मिळेल त्या मजुरीवर काम करण्यास तयार असल्याचे चित्र आहे.

> महापालिका प्रशासनाने कुदळवाडीत अतिक्रमण कारवाई केल्याने या भागातील भंगार गोदामांसह अन्य लघुउद्योगांचे स्थलांतर झाले. परिणामी, मजूर अड्ड्यांवरील मजुरांची संख्या घटली आहे. पूर्वी कोणत्याही कामासाठी सहज मजूर मिळायचे. सध्या जे आहेत त्यांना रोजगार मिळत नाही. या मजुरांच्या पुनर्वसनासाठी महापालिका आणि लोकप्रतिनिधींनी प्रयत्न करावेत.
>
> **- युवराज पवार, अध्यक्ष, पिंपरी चिंचवड कामगार संघटना.**

या भागातील कारवाईनंतर अनेक लघुउद्योग, भंगार गोदामे बंद झाल्याने मजुरांवर स्थलांतराची वेळ आली आहे. काही मजूर कामाच्या शोधात भोसरी, तळवडे, मोशी, चाकण आणि शहराच्या विविध भागांमध्ये स्थलांतरित झाले आहेत, तर काही जणांनी मूळ गावी परतण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, प्रशासनाच्या 3 कारवाईमुळे अवैध व्यवसायांना आळा बसत असला तरी हजारो कुटुंबांच्या रोजगाराचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे पर्यायी रोजगार उपलब्ध करून देण्याची मागणी मजूर आणि स्थानिकांकडून होत आहे.



## भूमिका

**अफगाणिस्तानमध्ये पुन्हा एकदा तालिबानच्या दडपशाहीचे भीषण वास्तव जगासमोर आले आहे. सत्तेवर आल्यानंतर महिलांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध घालण्याची मालिका सुरू करणाऱ्या तालिबानने आता महिलांच्या पेहरावावर नियंत्रण ठेवण्यासाठी थेट चाबकाचा वापर सुरू केल्याचे वृत्त अत्यंत धक्कादायक आहे.**

# तालिबानचा नवा फतवा : महिलांसाठी भीतीचे राज्य



शिक्षण, रोजगार, सार्वजनिक जीवनातील सहभाग आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य यांसारख्या मूलभूत अधिकारांपासून आधीच वंचित असलेल्या अफगाण महिलांवर हा आणखी एक अमानुष अन्याय आहे. तालिबानच्या 'नैतिक पोलिसां'कडून महिलांच्या कपड्यांची तपासणी करण्यासाठी रस्त्यांवर, सार्वजनिक वाहनांमध्ये आणि खासगी कारमध्येही छापेमारी केली जात आहे.

कथित ड्रेस कोडचे पालन न केल्याच्या आरोपावरून महिलांना सार्वजनिक ठिकाणी चाबकाने फटके मारले जात आहेत, त्यांना अटक केली जात आहे आणि अनेकदा त्यांचा ठावठिकाणाही लागत नाही. ही परिस्थिती केवळ महिलांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालणारी नसून मानवी प्रतिष्ठेवर थेट हल्ला करणारी आहे. कोणत्याही समाजाच्या प्रगतीचे मोजमाप त्या समाजातील महिलांच्या स्थितीवरून केले जाते. मात्र अफगाणिस्तानमध्ये महिलांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून नव्हे, तर नियंत्रणाखाली ठेवण्याची वस्तू म्हणून पाहिले जात असल्याचे चित्र दिसते. शिक्षण घेण्याचा अधिकार नाकारणे, नोकरी करण्यास मज्जाव करणे, पुरुष संरक्षकाविना प्रवास करण्यास बंदी घालणे आणि आता पेहरावाच्या नावाखाली शारीरिक शिक्षा देणे, ही सर्व पावले मध्ययुगीन मानसिकतेची साक्ष देतात. विशेष चिंतेची बाब म्हणजे या कारवायांमुळे अफगाण महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक महिलांनी घराबाहेर पडणेच बंद केले आहे. सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांचा सहभाग जवळपास संपुष्टात येत आहे. याचा परिणाम केवळ महिलांवरच नव्हे, तर संपूर्ण अफगाण समाजाच्या विकासावर होणार आहे.

अर्ध्या लोकसंख्येला घरात डांबून कोणताही देश प्रगती करू शकत नाही. संयुक्त राष्ट्रांसह विविध आंतरराष्ट्रीय संस्थांनी या कारवायांबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. मानवी हक्कांचे उघड उल्लंघन थांबवण्याचे आणि महिलांच्या मूलभूत अधिकारांचा सन्मान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मात्र केवळ निषेध व्यक्त करून चालणार नाही. आंतरराष्ट्रीय समुदायाने अधिक प्रभावी राजनैतिक आणि मानवीय दबाव निर्माण करण्याची गरज आहे. अफगाण महिलांच्या हक्कांसाठी जागतिक स्तरावर ठोस भूमिका घेणे आज काळाची गरज बनली आहे.

महिलांना सन्मानाने जगण्याचा, शिक्षण घेण्याचा, काम करण्याचा आणि स्वतःचे निर्णय घेण्याचा अधिकार हा कोणत्याही सरकारच्या कृपेवर अवलंबून नसतो; तो त्यांचा जन्मसिद्ध मानवी हक्क असतो. तालिबानची 'चाबूकसंहिता' हा केवळ एका देशाचा अंतर्गत प्रश्न नाही, तर मानवतेसमोरील गंभीर आव्हान आहे. महिलांच्या स्वातंत्र्यावर चाबकाचे फटकारे मारून समाजाची प्रगती साधता येत नाही. उलट अशा दडपशाहीमुळे अन्याय, भीती आणि अस्थिरता वाढते. त्यामुळे अफगाणिस्तानातील महिलांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी जगाने एकजूट दाखविणे आवश्यक आहे.

## प्रासंगिक »

### दानाचे महत्त्व

**हजरत उमर आपल्या प्रजेची अत्यंत काळजी घेत असत. एकदा राजधानीत भीषण आग लागली. आगीने शहराचा मोठा भाग व्यापला होता. लोकांनी आग विझवण्यासाठी खूप प्रयत्न केले.**

पण आग आटोक्यात येत नव्हती. घरे, पिके आणि मालमत्ता जळून खाक झाली होती. लोक भयभीत झाले आणि हजरत उमर यांच्याकडे मदतीसाठी गेले. हजरत उमर म्हणाले, "ही आग खुदाच्या कोपाचे प्रतीक असू शकते. आता गरिबांना अन्न-दान करा आणि निष्काम भावनेने मदत करा." लोकांनी सांगितले की, ते आधीपासूनच दान करत आहेत.

त्यावर उमर म्हणाले, "दानामागे प्रसिद्धी किंवा सन्मानाची अपेक्षा असेल, तर ते खरे पुण्यकर्म नाही. दान निःस्वार्थ भावनेने केले पाहिजे." हजरत उमर यांच्या शब्दांचा लोकांवर परिणाम झाला. त्यांनी कोणत्याही अपेक्षेशिवाय गरजूंना मदत करण्यास सुरुवात केली. काही काळात आगही आटोक्यात आली. लोकांनी खुदाचे आणि हजरत उमर यांचे आभार मानले.

- तात्पर्य : **निःस्वार्थ भावनेने केलेले दान कधीही लोकांच्या अंतरात्म्यापर्यंत पोहोचते.**

वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळविण्याचा प्रमुख मार्ग म्हणून 'नीट' परीक्षेला दिलेले अनन्यसाधारण महत्त्व पुन्हा एकदा प्रश्नचिन्हांच्या भोवऱ्यात सापडले आहे.

# डॉक्टर घडविण्यासाठी तीन तासांची परीक्षा पुरेशी का?

दरवर्षी पेपरफुटी, गैरप्रकार, गुणफुगवटा किंवा परीक्षेतील त्रुटींच्या बातम्या समोर येत असल्याने केवळ एका तीन तासांच्या परीक्षेच्या आधारे विद्यार्थ्यांचे भविष्य ठरविणे कितपत योग्य आहे, यावर गंभीर चर्चा होणे आवश्यक आहे. 'नीट'चा मूळ उद्देश देशभरातील वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया एकसमान आणि पारदर्शक करणे हा होता. मात्र कालांतराने ही परीक्षा गुणवत्तेपेक्षा कोचिंग-केंद्रित व्यवस्था बनत चालल्याचे दिसून येते.

लाखो रुपये खर्च करून खासगी कोचिंग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणारा फायदा आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांची मर्यादा यामुळे शिक्षणातील विषमता वाढत आहे. परिणामी, ग्रामीण व सर्वसामान्य कुटुंबांतील अनेक गुणवान विद्यार्थी स्पर्धेत मागे पडतात. खरा प्रश्न असा आहे की, वैद्यकीय व्यवसायासाठी आवश्यक असलेली संवेदनशीलता, सातत्य, प्रात्यक्षिक कौशल्ये आणि समाजसेवेची जाणीव यांचे मोजमाप केवळ बहुपर्यायी प्रश्नपत्रिकेद्वारे होऊ शकते का? उत्कृष्ट



गुण मिळविणारा प्रत्येक विद्यार्थी उत्तम डॉक्टर होईलच, याची हमी देता येत नाही. दुसरीकडे, शालेय शिक्षणात सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेकडे दुर्लक्ष होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने नववी ते बारावी या कालावधीतील सातत्यपूर्ण मूल्यमापनाला महत्त्व दिले आहे.

विद्यार्थ्यांची विषयांतील प्रगती, प्रयोगशाळेतील कामगिरी, प्रात्यक्षिक अनुभव आणि समाजाभिमुख उपक्रमांचा विचार करून प्रवेश प्रक्रिया राबविण्याचा पर्याय गांभीर्याने तपासण्याची गरज आहे. त्यामुळे शाळांचे महत्त्व वाढेल आणि केवळ परीक्षाकेंद्रित शिक्षणाला आळा बसेल.

याचबरोबर वैद्यकीय शिक्षणाच्या जागाही वाढविणे आवश्यक आहे. गुणवत्तापूर्ण आणि परवडणारी वैद्यकीय महाविद्यालये अधिक प्रमाणात उपलब्ध झाली, तर प्रवेशासाठी निर्माण होणारा प्रचंड ताण कमी होईल. खासगी महाविद्यालयांच्या अवाढव्य शुल्कामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक ओझे पडते, तर काहीजण गैरमार्गांचा अवलंब करण्यास प्रवृत्त होतात.

'नीट'सारखी राष्ट्रीय परीक्षा पूर्णपणे रद्द करण्याची गरज नसली, तरी तिची भूमिका पुनर्निर्धारित करणे आवश्यक आहे. पात्रता चाचणी, शालेय मूल्यमापन आणि इतर निकष यांचा समन्वय साधणारी बहुआयामी प्रवेशप्रक्रिया अधिक न्याय्य ठरू शकते. लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा निर्णय एका दिवसाच्या परीक्षेवर अवलंबून ठेवण्याऐवजी त्यांच्या दीर्घकालीन शैक्षणिक प्रवासाचे मूल्यांकन करणे हीच काळाची गरज आहे. अशा बदलातूनच अधिक सक्षम, संवेदनशील आणि गुणवत्तापूर्ण डॉक्टर घडू शकतील.

## ।। अभंगवाणी ।।



मरणाही आधीं राहिलों मरोनी ।  
मग केलें मनीं होतें तैसें ॥१॥

आतां तुम्ही पाहा आमुचें नवल ।  
नका वेचूं बोल वांयांविण ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# देवदर्शनावरुन परतणाऱ्या भाविकांवर काळाची झडप

## रांजणी गावातील भाविकांवर शोककळा; अपघातात नऊ जणांचा जागीच मृत्यू

**महाईन्यूज । माळशिरस**

**देवदर्शन करून घरी परतणाऱ्या भाविकांवर काळाने वाटेतच झडप घातल्याची हृदयद्रावक घटना सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यात रविवारी सायंकाळी घडली. म्हसवड-पंढरपूर मार्गावरील तांदळवाडी गावाजवळ भाविकांची पिकअप गाडी अनियंत्रित होऊन रस्त्यालगतच्या विहिरीत कोसळल्याने नऊ जणांचा मृत्यू झाला. या अपघातात अनेक जण जखमी झाले असून काहींची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.**




मिळालेल्या माहितीनुसार, पंढरपूर तालुक्यातील रांजणी गावातील भाविक म्हसवड येथील सिद्धनाथ मंदिरात दर्शनासाठी गेले होते. दर्शन आटोपल्यानंतर सर्वजण पिकअप वाहनातून गावाकडे परतत होते. म्हसवड-तांदळवाडी मार्गावरून प्रवास सुरू असताना तांदळवाडी गावाजवळ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि पिकअप थेट रस्त्यालगत असलेल्या विहिरीत कोसळली.

अपघात होताच परिसरात एकच खळबळ उडाली. विहिरीत मोठ्या प्रमाणात पाणी असल्याने वाहनातील अनेक जण पाण्यात अडकले. स्थानिक नागरिक, पोलीस आणि प्रशासनाच्या पथकांनी तातडीने बचावकार्य सुरू केले. काही जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले, तर अनेकांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.

या दुर्घटनेत नऊ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती असून मृतांमध्ये महिला आणि लहान मुलांचाही समावेश असल्याचे सांगण्यात येत आहे. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, पोलीस यंत्रणा तसेच आपत्कालीन सेवा घटनास्थळी दाखल झाल्या. बचाव आणि मदतकार्य युद्धपातळीवर सुरू असून विहिरीत कोणी अडकले आहे का, याचीही तपासणी करण्यात येत आहे.

माळशिरसचे आमदार उत्तम जानकर यांनी अपघाताबाबत दुःख व्यक्त करताना सांगितले की, या दुर्घटनेत चार महिला आणि चार लहान मुलांचाही समावेश असल्याची माहिती मिळाली आहे. रस्त्याच्या अगदी कडेला विहीर असल्याने वाहन थेट पाण्यात कोसळले. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून प्रशासनाकडून त्याची चौकशी सुरू आहे.

दरम्यान, आमदार रोहित पवार यांनीही या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत जखमींच्या लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना केली असून, अपघातामागील कारणांचा शोध घेऊन शासकीय यंत्रणेने बचाव आणि मदतकार्यात तत्परतेने कार्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. या भीषण अपघातामुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### विहिरीत कोसळली पिकअप

पंढरपूर तालुक्यातील रांजणी गावातील भाविक म्हसवड येथील सिद्धनाथांच्या दर्शनासाठी गेले होते. दर्शन आटोपून परतत असताना माळशिरस तालुक्यातील तांदळवाडी गावाजवळ पिकअप वाहन अनियंत्रित होऊन रस्त्यालगतच्या विहिरीत कोसळले. या भीषण अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. विहिरीत पाणी असल्याने बुडून मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

# आजपासून शाळांची घंटा वाजणार; विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळांची जय्यत तयारी

**महाईन्यूज । पुणे**

**उन्हाळी सुटीनंतर आज (दि. १५) पासून राज्यातील बहुतांश राज्य मंडळाच्या शाळा पुन्हा गजबजणार आहेत. तब्बल दीड महिन्यांच्या सुट्टीनंतर विद्यार्थी नव्या उत्साहाने शाळेत परतणार असून, त्यांच्या स्वागतासाठी शाळा प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली आहे. वर्गखोल्यांची स्वच्छता, परिसराची सजावट, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहांची दुरुस्ती तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.**



नवीन शैक्षणिक वर्षाचा पहिला दिवस विद्यार्थ्यांसाठी आनंददायी आणि संस्मरणीय ठरावा यासाठी विविध शाळांमध्ये प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. फुगे, रंगीबेरंगी रांगोळ्या, पुष्पवर्षाव आणि टाळ्यांच्या गजरात विद्यार्थ्यांचे स्वागत केले जाणार आहे. काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांना फुले, शालेय साहित्य तसेच गोडधोड देऊन शुभेच्छा देण्याची तयारी करण्यात आली आहे.



पहिल्यांदाच शाळेत दाखल होणाऱ्या बालवाडी आणि पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहेत. पालकांसोबत शाळेत येणाऱ्या चिमुकल्यांची भीती दूर करण्यासाठी शिक्षकांकडून खेळ, गाणी आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेचे वातावरण लवकर आत्मसात करता येणार आहे. शिक्षकांनी नव्या अभ्यासक्रमानुसार अध्यापनाचे नियोजन पूर्ण केले असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडा, कला, संस्कृती आणि विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

दरम्यान, शालेय वाहतूक व्यवस्था, बससेवा आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांनी वेळेवर शाळेत उपस्थित राहून आवश्यक शैक्षणिक साहित्य सोबत आणावे, असे आवाहन शाळा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. उन्हाळी सुटीनंतर मित्र-मैत्रिणींची भेट, नव्या पुस्तकांचा सुगंध आणि नव्या ज्ञानप्रवासाची सुरुवात यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आजपासून सुरू होणाऱ्या नव्या शैक्षणिक वर्षाकडे विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांचे लक्ष लागले आहे.

### ‘आठवडे बाजार’ उपक्रमातून शाळेच्या पहिल्या दिवसाची अनोखी सुरुवात

एम.व्ही.एम. सेमी इंग्लिश व मराठी पूर्व प्राथमिक शाळेत शाळेचा पहिला दिवस ‘आठवडे बाजार’ या अभिनव उपक्रमातून उत्साहात साजरा करण्यात आला. ‘बारा बलुतेदार’ संकल्पनेची ओळख करून देण्यासाठी विद्यार्थ्यांनी चांभार, सुतार, डॉक्टर, शिक्षिका आदी विविध व्यवसायांची वेशभूषा परिधान करून आकर्षक सादरीकरण केले. प्रत्यक्ष अनुभव आणि सहभागातून शिक्षणाची गोडी निर्माण करण्याचा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे मुख्याध्यापिका मुक्ता पेंडसे यांनी सांगितले.

# बैरुतवर इस्रायलचा भीषण हल्ला, तणाव आणखी वाढला

## इराणसोबत आजच करार होणार असल्याचा ट्रम्प यांचा दावा

**महाईन्यूज । जोरहाट**

**पश्चिम आशियातील संघर्ष थांबवण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत आजच ऐतिहासिक शांतता करारावर स्वाक्षरी होणार असल्याचा मोठा दावा केला असतानाच, इस्रायलने लेबनॉनची राजधानी बैरुतच्या दक्षिण भागावर भीषण हवाई हल्ले चढविल्याने परिस्थिती पुन्हा एकदा चिघळली आहे. ट्रम्प यांच्या वक्तव्यानंतर काही तासांतच झालेल्या या हल्ल्यामुळे संभाव्य शांतता प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**



इस्रायली हवाई दलाने रविवारी बैरुतच्या दक्षिण उपनगरांमध्ये क्षेपणास्त्रांचा मारा केला. या हल्ल्यात हेजबोलाच्या कथित कमांड आणि नियंत्रण केंद्राला लक्ष्य करण्यात आल्याचा दावा इस्रायली लष्कराने केला आहे. इस्रायली नागरिक आणि दक्षिण लेबनॉनमध्ये तैनात सैनिकांविरोधात कट रचण्यासाठी या केंद्राचा वापर केला जात असल्याचा आरोप लष्कराने केला.

इस्रायली लष्कराच्या निवेदनानुसार, हेजबोलाने यापूर्वी इस्रायलच्या भूभागावर हवाई हल्ले केल्यानंतर प्रत्युत्तरादाखल ही कारवाई करण्यात आली. त्यामुळे दोन्ही बाजूंतील संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, इराणच्या दृष्टीने लेबनॉनमधील परिस्थिती अत्यंत महत्त्वाची मानली जाते. इराणने यापूर्वी अनेकदा स्पष्ट केले आहे की, लेबनॉनमधील घडामोडी आणि संभाव्य शांतता करार हे एकमेकांपासून वेगळे करता येणार नाहीत. त्यामुळे बैरुतवरील ताज्या हल्ल्यामुळे प्रस्तावित कराराच्या वाटाघाटींना मोठा धक्का बसू शकतो.

सध्या कतारचे एक शिष्टमंडळ तेहरानमध्ये विविध पक्षांमधील मतभेद दूर करण्यासाठी प्रयत्न करत असल्याची माहिती समोर आली आहे. होर्मुझ सामुद्रधुनीतील तणाव, संभाव्य नौदल नाकेबंदी आणि लेबनॉनमधील संघर्ष या सर्व मुद्द्यांवर तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

### बैरुतवर हल्ल्याचे कारण काय?

इस्रायली लष्कराच्या दाव्यानुसार, बैरुतच्या दक्षिण उपनगरातील हेजबोलाच्या कमांड आणि नियंत्रण केंद्रावर हा हल्ला करण्यात आला. इस्रायली नागरिक आणि दक्षिण लेबनॉनमध्ये तैनात असलेल्या सैन्याविरोधात कट रचण्यासाठी या केंद्राचा वापर केला जात असल्याचा आरोप इस्रायलने केला आहे. हेजबोलाकडून इस्रायलवर हवाई हल्ले झाल्यानंतर प्रत्युत्तरादाखल ही कारवाई करण्यात आल्याचे इस्रायली लष्कराने स्पष्ट केले आहे.

# रशियाकडून ५.८ अब्ज युरोंच्या जीवाश्म इंधनाची खरेदी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**युक्रेन युद्धानंतर रशियावर पाश्चात्य देशांनी निर्बंध लादले असतानाही भारताने रशियाकडून इंधन खरेदीचा वेग कायम ठेवला आहे. मे २०२६ मध्ये भारताने रशियाकडून विक्रमी प्रमाणात जीवाश्म इंधनाची आयात केली असून, रशियन इंधन खरेदी करणाऱ्या देशांमध्ये भारत दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. ऊर्जा क्षेत्रातील संशोधन संस्था 'सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी अँड क्लीन एअर' (सीआरईए) यांच्या अहवालातून ही माहिती समोर आली आहे.**



अहवालानुसार, मे महिन्यात भारताने रशियाकडून सुमारे ५.८ अब्ज युरो (सुमारे ६.७ अब्ज डॉलर) किमतीचे हायड्रोकार्बन आयात केले. यामध्ये कच्च्या तेलाचा सर्वाधिक वाटा असून, एकूण आयातीपैकी तब्बल ४.८ अब्ज युरो मूल्याचे कच्चे तेल भारताने खरेदी केले. याशिवाय ५५० दशलक्ष युरो मूल्याची पेट्रोलियम उत्पादने आणि ४२९ दशलक्ष युरो मूल्याचा कोळसा आयात करण्यात आला.

सीआरईएच्या आकडेवारीनुसार, भारताच्या कच्च्या तेलाच्या आयातीत एप्रिलच्या तुलनेत मे महिन्यात आठ टक्क्यांची वाढ झाली आहे. गुजरातमधील वाडिनार रिफायनरीमध्ये रशियन तेलाचा पुरवठा ३६ टक्क्यांनी वाढला, तर जामनगर रिफायनिंग संकुलात १४ टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली. सार्वजनिक क्षेत्रातील रिफायनरींनीही रशियन तेल खरेदी पुन्हा वाढविली आहे. न्यू मंगळुरू रिफायनरीमध्ये १३ टक्के, विशाखापट्टणममध्ये ४२ टक्के पुरवठा वाढला असून, ओडिशातील पारादीप रिफायनरीने गेल्या दोन वर्षांतील सर्वाधिक रशियन तेल स्वीकारल्याचा विक्रम केला आहे.

युक्रेन युद्धानंतर अमेरिका आणि युरोपीय देशांनी रशियावर आर्थिक निर्बंध लागू केले असले तरी भारताने आपल्या ऊर्जा गरजा आणि इंधन खर्च कमी करण्याच्या उद्देशाने रशियन तेल खरेदी सुरू ठेवली आहे. कमी दरात उपलब्ध होणारे रशियन कच्चे तेल भारतीय रिफायनरींसाठी फायदेशीर ठरत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

रशियाच्या कच्च्या तेलाच्या निर्यातीमध्ये चीन पहिल्या क्रमांकावर असून, चीनने सुमारे ५० टक्के तेल खरेदी केले आहे. भारत ३६ टक्के वाट्यासह दुसऱ्या क्रमांकावर आहे. रशियाला सर्वाधिक ७ अब्ज युरोंचे उत्पन्न चीनकडून मिळाले आहे.

विशेष म्हणजे, रशियन कच्च्या तेलावर प्रक्रिया करून भारत, तुर्की, ब्रुनेई आणि जॉर्जिया येथील रिफायनरींनी तयार केलेली पेट्रोलियम उत्पादने युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडसह विविध देशांना निर्यात केली. या निर्यातीचे मूल्य सुमारे ६४१ दशलक्ष युरो इतके असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. यामध्ये भारतातील जामनगर रिफायनरीमधून अमेरिकेला पाठविण्यात आलेल्या इंधनाचाही समावेश आहे.

### चीन अव्वल, भारत दुसऱ्या स्थानावर

रशियाच्या कच्च्या तेलाच्या निर्यातीमध्ये चीन सर्वात मोठा ग्राहक ठरला असून त्याने सुमारे ५० टक्के तेल खरेदी केले आहे. भारत ३६ टक्के वाट्यासह दुसऱ्या क्रमांकावर आहे. रशियाला सर्वाधिक ७ अब्ज युरोंचे उत्पन्न चीनकडून मिळाले असून, भारताकडूनही विक्रमी इंधन खरेदी झाल्याने रशियाच्या ऊर्जा निर्यातीला मोठा आधार मिळाला आहे.

दरम्यान, भारताने रशियाकडून तेल खरेदी कमी करावी, अशी भूमिका अमेरिकेकडून वेळोवेळी मांडण्यात आली होती. मात्र, ऊर्जा सुरक्षेला प्राधान्य देत भारताने रशियन तेल खरेदीचा मार्ग कायम ठेवला असून, मे महिन्यातील विक्रमी आयात ही त्याचीच पुष्टी मानली जात आहे.

# तुंबाड 2 मध्ये आलिया



आलिया भट्ट पीरियड हॉरर ड्रामा तुंबाडच्या सीक्वेलचा हिस्सा ठरणार असल्याची चर्चा दीर्घकाळापासून सुरू होती. ट्रिलॉजीच्या दुसऱ्या चित्रपटात आलियाचा कॅमियो असेल तर तिसऱ्या चित्रपटात ती मुख्य भूमिकेत असणार आहे. आलिया भट्ट खरोखरच सोहम शाहच्या चित्रपटाचा हिस्सा ठरणार आहे. आलिया ही तुंबाड 2 मध्ये कॅमियो भूमिका साकारणार आहे. या चित्रपटात तिची भूमिका छोटी असेल परंतु ती मोठा प्रभाव पाडणार आहे. जी तुंबाड 3 शी कनेक्ट करेल आणि त्यात आलिया मुख्य भूमिकेत दिसून येणार आहे. तुंबाड 2 मध्ये स्वत:च्या कॅमियोसाठी आलिया 15 दिवसांचे चित्रिकरण करणार आहे. ही भूमिका चित्रपटाच्या पूर्ण कहाणीसाठी अत्यंत आवश्यक आहे. तसेच ही भूमिका तिसऱ्या भागात आणखी पुढे जाणार आहे. या चित्रपटात आलियासोबत सोहम शाह मुख्य भूमिकेत असणार आहे. आदेश प्रसादच्या दिग्दर्शनात तयार होणारा तुंबाड 2 हा चित्रपट पुढील वर्षी प्रदर्शित होणार आहे. यानंतर तिसऱ्या चित्रपटाची तयारी सुरू होणार आहे. आलियाकडे सध्या यावेळी अनेक बिगबजेट चित्रपट आहेत. ती संजय लीला भंसाळीच्या लव अँड वॉर या चित्रपटात दिसून येणार आहे. याचबरोबर शर्वरी वाघसोबत ती 'अल्फा' या स्पाय थ्रिलरमध्ये काम करत आहे.

# 'रागिनी 3'मध्ये तमन्ना भाटिया



रागिनी 3 चित्रपटाचे दिग्दर्शन शशांक घोष करणार आहे. या चित्रपटात तमन्ना भाटिया ही अभिनेत्री दिसून येणार असून तिची जोडी आमिर खानचा पुत्र जुनैदसोबत जमणार आहे. आमिरचा पुत्र जुनैदने यापूर्वी काही चित्रपटांमध्ये काम केले असले तरीही याला यश मिळालेले नाही. यामुळे तो आता हॉररपटात काम करणार आहे. रागिनी एमएमएस सीरिजच्या चित्रपटांमध्ये रोमान्स, विश्वासघात आणि हॉररचा डोस प्रेक्षकांना दिला जातो, असाच प्रकार तिसऱ्या भागातील चित्रपटात पहायला मिळणार आहे. साहिर रजा या चित्रपटाची निर्मिती करणार आहेत. रागिनी एमएमएस 3 चित्रपटात आणखी काही दिग्गज कलाकारांची वर्णी लागणार असून याचे चित्रिकरण लवकरच सुरू केले जाणार आहे. रागिनी 3 चित्रपटासोबत तमन्ना भाटिया ही 'व्ही. शांताराम' यांच्या बायोपिकमध्ये महत्त्वाची भूमिका साकारत आहे. तसेच ती 'वन' हा भयपट देखील करत आहे. याचबरोबर 'रेंजर' नावाचा चित्रपट तिच्याकडे आहे. तमन्नासाठी चालू वर्षे अत्यंत महत्त्वाचे ठरणार असून तिचे अनेक चित्रपट यंदा प्रदर्शित होणार आहेत.



# अभिनेत्री सुरभी ज्योती झाली आई

टीव्ही अभिनेत्री सुरभी ज्योती आई झाली आहे. तिने १४ जून रोजी तिच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटवर एक पोस्ट शेअर करत आनंदाची बातमी चाहत्यांसोबत शेअर केली. सुरभीने १३ जून रोजी एका गोंडस मुलीला जन्म दिला आहे. सुरभीने इंस्टाग्रामवर एक खास पोस्ट शेअर करत 'इट्स अ गर्ल' असे लिहिले आहे. यासोबतच १३ जून, २०२६ ही तारीख लिहिली आहे. या पोस्टमध्ये एका गुलाबी रंगाच्या फुलासोबत एका कळीचे चित्र असून खाली 'सुरभी आणि सुमित यांच्याकडून प्रेम' असे लिहिले आहे. सुरभीने या खास पोस्टसोबत कॅप्शनमध्ये लिहिले की, "आम्हाला मुलगी झाली आहे... आमचे हृदय प्रेम आणि कृतज्ञतेने भरून आले आहे." या बातमींनंतर कलाकार आणि चाहत्यांकडून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. सुरभी ज्योतीने २०२४ मध्ये तिचा बॉयफ्रेंड सुमित सुरीसोबत मोठ्या थाटामाटात लग्न केले होते. आता लग्नाच्या दोन वर्षांनंतर ते आई-बाबा झाले आहेत. सुरभी ज्योतीला 'कुबूल है' या टीव्ही मालिकेतून विशेष ओळख मिळाली, ज्यामध्ये तिने 'झोया'ची भूमिका साकारली होती. या मालिकेत ती करण सिंग ग्रोव्हरसोबत स्क्रीन शेअर करताना दिसली होती. यानंतर तिने अनेक मालिकांमध्ये काम केले, पण 'नागिन ३' मुळे तिला लोकप्रियता मिळाली.



# टी-२० मुंबई लीगमध्ये राडा!

## तुषार देशपांडे अन् गौरव जठर भिडले; डग आऊटमध्ये सगळ्यांची धावपळ

**महाईन्यूज । मुंबई**

**टी-२० मुंबई लीग स्पर्धेतील अंतिम सामना आर्क्स अंधेरी आणि मराठा रॉयल्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. अंतिम सामना जसा हवा, तसाच हा सामना रंगला. शेवटच्या षटकापर्यंत दोन्ही संघांना विजय मिळवण्याची सुवर्णसंधी होती. अखेर मराठा रॉयल्सकडून रोहन राजेने निर्णायक षटक टाकलं आणि मराठा रॉयल्स संघाला सलग दुसऱ्यांचा जेतेपदाची ट्रॉफी जिंकून दिली. पण या सामन्यादरम्यान अनेक नाट्यमय घटना घडल्या. नेमकं काय घडलं? जाणून घ्या.**



तर झाले असे की, धावांचा पाठलाग करत असताना मराठा रॉयल्स संघाकडून १९ वे षटक टाकण्यासाठी इरफान उमेर गोलंदाजीला आला. त्यावेळी गौरव जठर स्ट्राईकवर होता. या षटकातील दुसऱ्याच चेंडूवर गौरव जठरने खणखणीत षटकार खेचला. त्यामुळे मराठा रॉयल्स संघावरील दबाव वाढला. पण पुढच्याच चेंडूवर सामना मराठा रॉयल्स संघाच्या बाजूने फिरला. कारण इरफान उमेरने त्याला पायचीत करत माघारी धाडलं. त्यामुळे गौरव जठरचा डाव १७ चेंडूत २३ धावांवर आटोपला.

गौरव जठर बाद झाल्यानंतर मराठा रॉयल्स संघातील खेळाडूंनी जोरदार जल्लोष केला. त्यावेळी गौरव जठर आणि मराठा रॉयल्स संघाचा अनुभवी गोलंदाज तुषार देशपांडे यांच्यात बाचाबाची झाली. दोघेही एकमेकांच्या अंगावर धावून आले. त्यावेळी मोईन खान आणि इतर खेळाडूंनी मध्यस्थी करत हा वाद मिळवला. पण त्यामुळे काही वेळ सामना थांबवावा लागला.

हा वाद इतक्यात थांबला नाही, त्यानंतर मराठा रॉयल्स संघातील खेळाडू आर्क्स अंधेरीच्या डगआऊटच्या दिशेने धावत गेला. पण त्यावेळी दोन्ही संघातील खेळाडूंमध्ये धराधरी झाली. त्यावेळी खेळाडूंना आणि सपोर्ट स्टाफमधील सदस्यांना मध्यस्थी करावी लागली. शेवटचे षटक टाकण्यासाठी रोहन राजे गोलंदाजीला आला. या षटकात आर्क्स अंधेरी संघाला विजयासाठी १४ धावांची गरज होती. पण रोहन राजेने आपल्या अनुभवाचा पुरेपूर फायदा घेत अचूक टप्प्यावर गोलंदाजी केली आणि मराठा रॉयल्स संघाला सलग दुसऱ्यांदा विजय मिळवून दिला.

### पंचांच्या हस्तक्षेपाने मैदानावरील वाद शांत

गौरव जाथर बाद झाल्यानंतर मराठा रॉयल्सच्या खेळाडूंनी आक्रमक सेलिब्रेशन केले, ज्यावर जाथरने नाराजी व्यक्त केली. त्यानंतर मराठा रॉयल्सचा वेगवान गोलंदाज तुषार देशपांडे आणि गौरव जाथर यांच्यात शाब्दिक चकमक झाली. अंतिम सामन्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पंच आणि इतर खेळाडूंनी तातडीने हस्तक्षेप करत हा वाद शांत केला.

# दक्षिण आफ्रिकेचा केला धुव्वा! ऑस्ट्रेलियाची दणदणीत सुरुवात

**महाईन्यूज । मैनचेस्टर**

**महिला टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेला सुरुवात झाली असून शनिवारी झालेल्या सामन्यात गतविजेत्या ऑस्ट्रेलियाने दमदार विजयाची नोंद केली. मँचेस्टरमधील ओल्ड ट्रॅफर्ड मैदानावर झालेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेचा तब्बल ६५ धावांनी पराभव करत स्पर्धेची शानदार सुरुवात केली. पहिल्याच सामन्यात ऑस्ट्रेलियन संघाने आपली ताकद दाखवत प्रतिस्पर्धी संघावर वर्चस्व गाजवले.**




या सामन्यात नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला काही विकेट्स गमावल्यानंतर मधल्या फळीत आलेल्या फिबी लिचफिल्डने आक्रमक खेळी करत डाव सावरला. तिने केवळ २४ चेंडूत अर्धशतक झळकावत ५० धावांची तडाखेबाज खेळी केली. तिच्याशिवाय अनुभवी एलिस पेरीने ३६ धावांचे योगदान दिले, तर जॉर्जिया वेअरहॅमने ३२ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. या फलंदाजांच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने निर्धारित २० षटकांत ८ बाद १७२ धावांचा मजबूत डोंगर उभा केला.

१७३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची सुरुवात निराशाजनक झाली. सलग विकेट्स पडत असल्याने त्यांना मोठी भागीदारी करता आली नाही. कर्णधार लॉरा वोल्वार्डने ३९ चेंडूत ४४ धावांची झुंजार खेळी केली, मात्र तिला इतर फलंदाजांची अपेक्षित साथ मिळाली नाही. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेचा संपूर्ण संघ १६.४ षटकांत अवघ्या १०७ धावांवर गारद झाला.

ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांनीही प्रभावी कामगिरी केली. जॉर्जिया वेअरहॅमने ३ विकेट्स घेत दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. तर सोफी मोलिनक्स आणि अलाना किंग यांनी प्रत्येकी दोन-दोन बळी घेत महत्त्वाचे योगदान दिले.

ग्रुप-१ मधील हा पहिला सामना जिंकत ऑस्ट्रेलियाने स्पर्धेत आपले वर्चस्व दाखवून दिले आहे. आता ऑस्ट्रेलियाचा पुढील सामना १७ जून रोजी लीड्स येथील हेडिंग्ले मैदानावर बांगलादेश महिला संघाविरुद्ध होणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज ™
ePaper
। सोमवार ।
दि. 15 जून 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पिंपरी-चिंचवड महापालिका सभेचे लाईव्ह प्रक्षेपण बंद!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**



पिंपरी-चिंचवड महापालिका सर्वसाधारण सभेचे कामकाज शहरवासीयांना समजावे म्हणून सत्ताधारी भाजपने सभा कामकाजाचे ऑनलाईन प्रक्षेपण सुरू केले होते. मात्र, ऑनलाईन सभा कामकाजामुळे सत्ताधारीच अडचणीत येत असल्याने तो प्रकार बंद करण्याची नामुष्की सत्ताधाऱ्यांवर ओढवली आहे. त्यामुळे सोमवारी (दि. 15) होणाऱ्या सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण (लाईव्ह) केले जाणार नाही.

महापालिकेत दुसऱ्यांदा भाजपची सत्ता आली आहे. नवे कारभारी महापालिकेत आल्याने सर्वसाधारण सभेचे कामकाज ऑनलाईन केले जावे, अशी मागणी वाढली होती. त्याची दखल घेऊन महापौर रवी लांडगे यांनी आयुक्तांना सभा कामकाजाचे थेट प्रक्षेपण करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार सभागृहाचे कामकाज ऑनलाईन करण्यात येत आहे. सर्वसाधारण सभेचे कामकाज शहरवासीयांना समजावे म्हणून सत्ताधारी भाजपने तो निर्णय घेतला होता.

सभेच्या थेट प्रक्षेपणामुळे नागरिकांसह सामाजिक कार्यकर्ते तसेच, नगरसेवकांच्या समर्थकांना नगरसेवक काय बोलले हे समजत होते. तर, कोणता नगरसेवक कोणत्या विषयावर कसा बोलत आहे, हे ही संपूर्ण शहरासमोर येत होते. तसेच, सभा कामकाजात नगरसेवक किती सहभाग घेतो, हे नागरिकांसह मतदारांना कळत होते. काही नगरसेवक थेट प्रक्षेपणातील स्वत:चा स्वतंत्र व्हिडीओ तयार करून त्याचे रिल्स बनवून सोशल मीडियावर व्हायरल करत होते. त्याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत होता.

## सोमवारच्या सभेचे थेट प्रक्षेपण नाही


अर्थसंकल्प सादर करण्यात येणार होता. त्यामुळे सर्वसाधारण सभेचे कामकाजाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. नियमित होणाऱ्या मासिक सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण केले जाणार नाही. येत्या सोमवारी (दि. 15) होणाऱ्या सर्वसाधारण सभेचे ऑनलाईन प्रक्षेपण केले जाणार नाही, असे सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी सांगितले.

## ऑनलाईन सभेमुळे भाजप पदाधिकारी अडचणीत

ऑनलाईन सभेमुळे फायदा होण्यापेक्षा अनेकदा सत्ताधारी भाजपचे पदाधिकारी अडचणीत सापडले होते. त्यामुळे महापौरांवर थेट दिलगिरी व्यक्त करण्याची वेळ आली होती. थेट प्रक्षेपणाचा प्रकार सत्ताधाऱ्यांच्या अंगलट आला आहे. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी सभा कामकाज ऑनलाईन करण्याचा निर्णय मागे घेतला आहे. यापुढे सभा ऑनलाईन पाहता येणार नाही.

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY AKURDI PUNE
Think | Thrive | Transform
ADMISSION OPEN
A.Y. 2026

DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.
It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.



UG/PG Programs
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# पिंपरी-चिंचवडकरांच्या नागरी प्रश्नांना सभागृहात वाचा फोडा

## लोकप्रतिनिधींना पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनचे निवेदन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित असलेल्या विविध नागरी प्रश्नांवर महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत प्रभावीपणे प्रतिनिधित्व करण्यात यावे, अशी मागणी पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघाने शहरातील नगर सदस्य आणि लोकप्रतिनिधींकडे केली आहे. यासंदर्भात महासंघाच्या वतीने सविस्तर निवेदन सादर करण्यात आले असून शहराच्या विकासाशी निगडित दहा महत्त्वाच्या विषयांवर सभागृहात चर्चा घडवून आणण्याची विनंती करण्यात आली आहे.**



वेगाने विस्तारत असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात नागरिक नियमितपणे कर भरून विकास प्रक्रियेत योगदान देत आहेत. मात्र दुसरीकडे वाढती लोकसंख्या, वाहतुकीचा वाढता ताण, मूलभूत सुविधांवरील दबाव आणि वाढती महागाई यामुळे अनेक नागरी प्रश्न गंभीर होत असल्याचे महासंघाने निवेदनात नमूद केले आहे. शहराच्या विकासाचा वेग आणि नागरिकांना मिळणाऱ्या सुविधांची गुणवत्ता यामध्ये समतोल राखण्यासाठी लोकप्रतिनिधींनी सभागृहात ठोस भूमिका घेणे आवश्यक असल्याचे महासंघाचे मत आहे.

निवेदनात शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेतील त्रुटी, वाहतूक कोंडी, पार्किंगचे वाढते प्रश्न, पदपथांवरील अतिक्रमणे, कचरा व्यवस्थापनातील अडचणी, मेट्रो प्रकल्पानंतरही लास्ट-माईल कनेक्टिव्हिटीचा अभाव, अनधिकृत होर्डिंग्जचा वाढता त्रास, अमेनिटी स्पेसवरील अतिरिक्त मालमत्ता कर, ट्रान्सफर टॅक्स आणि दत्त मंदिर रस्ता परिसरातील वाहतुकीच्या समस्यांकडे विशेष लक्ष वेधण्यात आले आहे.

महासंघाने नागरिकांवर परिणाम करणाऱ्या धोरणात्मक निर्णयांबाबत अधिक पारदर्शकता आणि संवादाची अपेक्षा व्यक्त केली आहे. विशेषतः महापालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत सार्वजनिक स्तरावर विविध चर्चा सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने अधिकृत श्वेतपत्रिका प्रसिद्ध करून वास्तव परिस्थिती नागरिकांसमोर मांडावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यामुळे नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास वाढेल आणि भविष्यातील आर्थिक व विकासविषयक निर्णयांबाबत स्पष्टता निर्माण होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

महासंघाच्या म्हणण्यानुसार, ही मागणी कोणत्याही राजकीय हेतूने किंवा टीकेच्या भूमिकेतून करण्यात आलेली नसून नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी दूर करून शहर अधिक नियोजनबद्ध, सुविधायुक्त आणि नागरिकाभिमुख बनविण्याच्या उद्देशाने करण्यात आली आहे. शहरातील विविध सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून प्राप्त झालेल्या सूचना, तक्रारी आणि अपेक्षांच्या आधारे हे निवेदन तयार करण्यात आले आहे.

महासंघाने लोकप्रतिनिधींना दिलेल्या निवेदनासोबत प्रत्येक विषयासंदर्भातील समस्या, त्यामागील कारणे, संभाव्य उपाययोजना, नागरिकांच्या अपेक्षा आणि सभागृहात मांडण्यासाठीचे मुद्दे यांचाही स्वतंत्र तपशील जोडला आहे. त्यामुळे या विषयांवर केवळ चर्चा न होता त्यावर ठोस निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

> पिंपरी-चिंचवड शहर झपाट्याने विकसित होत असले तरी नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित अनेक प्रश्न अजूनही प्रलंबित आहेत. नागरिक नियमितपणे कर भरतात आणि शहराच्या विकासात योगदान देतात. त्यामुळे त्यांच्या अपेक्षा आणि समस्या लोकप्रतिनिधींनी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत प्रभावीपणे मांडणे ही लोकशाहीतील मूलभूत जबाबदारी आहे. आमची भूमिका कोणावर टीका करण्याची नाही, तर नागरिकांच्या प्रश्नांना योग्य व्यासपीठ मिळावे आणि त्यावर सकारात्मक निर्णय व्हावेत, ही आहे. प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नातूनच पिंपरी-चिंचवड अधिक स्वच्छ, सुरक्षित, सुबक आणि नागरिकाभिमुख शहर बनू शकते.
>
> **- सचिन लोंढे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघ.**

# महापालिकेच्या मोरवाडी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची उल्लेखनीय कामगिरी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयांतर्गत प्रशिक्षण महासंचालनालय (डीजीटी) यांनी देशभरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे (आयटीआय) श्रेणीकरण (ग्रेडिंग) जाहीर केले असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मोरवाडी येथील औद्योगिक प्रशिक्षण विभागाने (आयटीआय) उत्कृष्ट कामगिरीची परंपरा कायम राखत देशपातळीवर मानाचे स्थान मिळविले आहे.**




प्रशिक्षण महासंचालनालयाने आयटीआयद्वारे प्रदान केल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाची गुणवत्ता, शैक्षणिक कामगिरी, प्रशिक्षण सुविधा, रोजगाराभिमुखता, संस्थात्मक व्यवस्थापन आणि विविध कार्यक्षमतेच्या निकषांच्या आधारे डेटा चलित ग्रेडिंग पद्धती लागू केली आहे. या पद्धतीनुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी डीजीटी एमआयएस पोर्टलवरील माहितीच्या आधारे देशातील सर्व आयटीआयचे मूल्यमापन करण्यात आले.

या ग्रेडिंगमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मोरवाडी आयटीआयने १० पैकी ९.२ गुण प्राप्त करून देशात ७ वा क्रमांक, महाराष्ट्र राज्यात ५ वा क्रमांक, पुणे विभागात २ रा क्रमांक तसेच पुणे जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविण्याचा मान पटकावला आहे.

विशेष म्हणजे, संस्थेने सलग दुसऱ्या वर्षी अशी उल्लेखनीय कामगिरी नोंदवून आपल्या गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण व्यवस्थेची आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांची प्रभावी छाप उमटविली आहे. संस्थेच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांना आणि कौशल्य विकासासाठी करण्यात आलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना या यशामुळे अधिक बळ मिळाले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका तसेच मोरवाडी औद्योगिक प्रशिक्षण विभागासाठी ही अत्यंत अभिमानास्पद बाब असून महापौर रवि लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्या नियंत्रणाखाली संस्थेचे कामकाज प्रभावीपणे सुरू आहे. या यशामध्ये संस्थेतील सर्व अधिकारी, कर्मचारी, प्रशिक्षक तसेच विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले असल्याची भावना औद्योगिक प्रशिक्षण विभाग मोरवाडीचे प्राचार्य तथा विभागप्रमुख शशिकांत पाटील यांनी व्यक्त केली.

मोरवाडी आयटीआयच्या या उल्लेखनीय यशामुळे संस्थेची शैक्षणिक गुणवत्ता, प्रशिक्षणाची उत्कृष्टता आणि उद्योगाभिमुख कौशल्य विकास क्षेत्रातील विश्वासार्हता पुन्हा अधोरेखित झाली असून भविष्यातही अधिक उंची गाठण्याचा संस्थेचा संकल्प असल्याचे प्राचार्य तथा विभागप्रमुख शशिकांत पाटील यांनी सांगितले.

# आरकेएल गॅलेक्सी स्कूलमध्ये भव्य रक्तदान शिबीर

## सामाजिक बांधिलकीतून १०० हून अधिक पालकांची नोंदणी; 'रॉबिन हूड आर्मी'चे सहकार्य

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव आणि मानवता निर्माण करण्यासाठी अग्रस्थानी असलेल्या 'आरकेएल गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल'च्या (RKL GALAXY INTERNATIONAL SCHOOL) वतीने आज सामाजिक बांधिलकी जपत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला शाळेतील पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, परिसरातून या उपक्रमाचे मोठे कौतुक होत आहे.**



शाळेच्या प्रांगणात आयोजित या शिबिरासाठी पालकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. शिबिरादरम्यान तब्बल १०० हून अधिक पालकांनी रक्तदानासाठी नोंदणी केली होती. त्यापैकी ५० हून अधिक रक्तदात्यांनी प्रत्यक्ष स्वेच्छेने रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली.

हे शिबीर सुरक्षित आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी 'रॉबिन हूड आर्मी ब्लड डोनेशन ड्राईव्ह'चे (Robin Hood Army Blood Donation Drive) स्वयंसेवक आणि तज्ज्ञ वैद्यकीय पथक विशेषत्वाने उपस्थित होते. त्यांच्या उत्कृष्ट नियोजन आणि सहकार्यामुळे संपूर्ण रक्तदान प्रक्रिया अत्यंत सुलभरीत्या संपन्न झाली.

सदरील शिबिराचे नियोजन व संचालन उत्साहात पार पडले. याप्रसंगी शाळेचे कार्यकारी अधिकारी डॉ. पुष्कर चोबे, सौ. मित्तल शाह यांच्यासह शाळेचे प्राचार्य, समन्वयक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालकांच्या या 'महादाना'मुळे परिसरात आरकेएल गॅलेक्सी स्कूलच्या या कौतुकास्पद उपक्रमाची जोरदार चर्चा आहे.

> "शाळेच्या आवाहनाला मान देऊन १०० हून अधिक पालकांनी नोंदणी केली आणि ५० हून अधिक जणांनी प्रत्यक्ष रक्तदान केले, हा प्रतिसाद भारावून टाकणारा आहे. 'रॉबिन हूड आर्मी'च्या स्वयंसेवकांनी आणि वैद्यकीय पथकाने केलेले नियोजन अत्यंत कौतुकास्पद होते. या यशस्वी उपक्रमाबद्दल मी सर्व रक्तदात्यांचे आणि सहकाऱ्यांचे मनापासून आभार मानते."
>
> **- सौ. मित्तल शाह (आरकेएल गॅलेक्सी स्कूल)**

> "आरकेएल गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नाही, तर समाजोपयोगी कार्यांमध्येही नेहमीच पुढे असते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांसह पालकांमध्ये सेवाभावाचा संदेश पोहोचला आहे. भविष्यातही अशा विविध सामाजिक उपक्रमांद्वारे समाजहितासाठी योगदान देण्याचा आमचा संकल्प कायम राहील."
>
> **- शाळा व्यवस्थापन**

> "रक्तदान हे श्रेष्ठ दान मानले जाते. एका व्यक्तीने केलेले रक्तदान अनेकांचे प्राण वाचवू शकते. आमच्या शाळेतील पालकांनी आज दाखवलेली सामाजिक बांधिलकी खरोखरच कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच असे मानवतावादी संस्कार रुजावेत, हाच या शिबिरामागील आमचा मुख्य उद्देश होता. भविष्यातही आम्ही अशा प्रकारचे सामाजिक उपक्रम राबवत राहू."
>
> **- डॉ. पुष्कर चोबे (कार्यकारी अधिकारी, आरकेएल गॅलेक्सी स्कूल)**

> शाळेने आयोजित केलेले हे रक्तदान शिबीर अतिशय कौतुकास्पद आणि प्रेरणादायी होते. आपल्या पाल्याच्या शाळेत जाऊन समाजासाठी असे योगदान देता येणे, हा आम्हा पालकांसाठी अभिमानाचा क्षण आहे. अशा उपक्रमांमुळे मुलांवरही सामाजिक बांधिलकीचे आणि मदतीचे उत्तम संस्कार होतात. अतिशय शिस्तबद्ध नियोजन आणि सुरक्षित वातावरणात हे शिबीर पार पडले, याबद्दल मी शाळा व्यवस्थापनाचे मनापासून आभार मानतो."
>
> **- गणेश कासार (पालक – इयत्ता ९ वी, लिली)**

## हॉटेल्सला रेटिंग देणं पडलं महागात.. ७ लाख ९४ हजारांची फसवणूक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**




हॉटेल्सला ऑनलाइन रेटिंग देऊन आर्थिक फायदा मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका ४१ वर्षीय व्यक्तीची तब्बल ७ लाख ९४ हजार ३९२ रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांना एका अज्ञात व्यक्तीने संपर्क साधून 'फाइव्ह स्टार हॉटेलला रेटिंग देण्याच्या टास्कमध्ये सहभागी झाल्यास चांगला आर्थिक फायदा मिळेल' असे सांगितले. त्यानंतर विविध टास्क पूर्ण करण्याच्या नावाखाली आरोपींनी फिर्यादीचा विश्वास संपादन केला. आर्थिक लाभाचे आमिष दाखवत आरोपींनी फिर्यादीला वेगवेगळ्या यूपीआय आयडीवर पैसे पाठविण्यास सांगितले. त्यानुसार फिर्यादीने टप्प्याटप्प्याने रक्कम जमा केली. मात्र नंतर कोणताही परतावा न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.

हा प्रकार २२ नोव्हेंबर २०२५ ते २३ डिसेंबर २०२५ या कालावधीत शिवदत्तनगर, पिंपरी गाव परिसरात घडला. फसवणुकीची तक्रार दाखल झाल्यानंतर पिंपरी पोलिसांनी माहिती तंत्रज्ञान अधिनियमासह संबंधित कलमांन्वये गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अधिकारी पोलीस निरीक्षक पाटील करीत आहेत. पोलिसांनी नागरिकांना ऑनलाइन गुंतवणूक, टास्क पूर्ण करून पैसे कमावणे किंवा रेटिंग देण्याच्या बदल्यात मोठ्या नफ्याचे आमिष दाखविणाऱ्या अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन केले आहे.

## वेबसाईटद्वारे गुंतवणुकीच्या आमिषाने तरूणाची २१ लाख ४८ हजारांची फसवणूक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**ऑनलाइन गुंतवणुकीवर अल्पावधीत मोठा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका तरुणाची तब्बल २१ लाख ४८ हजार ४९० रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी निगडी पोलिस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान अधिनियम आणि फसवणुकीच्या कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुण (वय २३) यांची त्यांच्या मित्रामार्फत आरोपींशी ओळख झाली होती. आरोपींनी "Botbro" नावाच्या वेबसाईटद्वारे गुंतवणूक केल्यास दरमहा ७ ते ८ टक्के परतावा मिळेल, असे आमिष दाखवले. त्यानुसार फिर्यादी व त्यांच्या साथीदारांकडून वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये वेळोवेळी एकूण २१ लाख ४८ हजार ४९० रुपये गुंतवण्यात आले.

सुरुवातीला आकर्षक परताव्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र, गुंतवलेली रक्कम परत काढण्याचा प्रयत्न केल्यानंतर ती मिळाली नाही. याबाबत आरोपींकडे वारंवार पाठपुरावा करूनही त्यांनी कोणतीही रक्कम परत न देता आर्थिक फसवणूक केल्याचे फिर्यादीच्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी सुयश सुनील शहापूरे (वय २४, रा. श्री साई गणेश पार्क बिजलीनगर चिंचवड), सुजीत सुनील काळे (वय २६, रा. शिवशंभो लेन, सिंबोसिस कॉलेज रोड, मुकाई चौक, किवळे) आणि खुशी तिवारी (वय २५, रा. तळेगाव दाभाडे) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच Botbro वेबसाईटचा धारक अद्याप फरार असून त्याचाही तपास सुरू आहे. निगडी पोलीस निरीक्षक घोडे पाटील या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway
Station